# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 22 December 2025
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २२ डिसेंबर २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- भाजपा हाच राज्यातला सर्वात मोठा पक्ष असल्याचं नगरपालिका निवडणुकांच्या निकालातून स्पष्ट- मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- देशाच्या विकासात आणि प्रगतीत आयआयटीचं मोठं योगदान-केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे गौरवोद्गार
- सदनिका घोटाळा प्रकरणी माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती

आणि

- बीड जिल्ह्याच्या विकासासाठी स्वयंप्रेरणेने काम करण्याचं अपारंपारिक ऊर्जा संचालक सुमन चंद्रा यांचं आवाहन

****

भाजपा हाच राज्यातला सर्वात मोठा पक्ष आहे, हे नगरपालिका निवडणुकांच्या निकालातून स्पष्ट झाल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. नागपूर जिल्ह्यातल्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि नगरसेवकांशी आज मुख्यमंत्र्यांनी नागपुरात आपल्या शासकीय निवासस्थानी संवाद साधला. यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत फडणवीस यांनी, २०१७ च्या तुलनेत राज्यात भाजप नगरसेवकांची संख्या या निवडणुकीत दुपटीनं वाढल्याची माहिती दिली. यावेळी बोलतांना मुख्यमंत्री म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

राज्यातल्या २८८ नगरपरिषदा आणि २८५ नगराध्यक्षपदांपैकी भाजपने सर्वाधिक ११७ जागा जिंकल्या, तर एकनाथ शिंदे यांच्यानेतृत्वात शिवसेना पक्षानं ५३, आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं ३७ जागा जिंकल्या आहेत. काँग्रेसला २८, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाला ७, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला ९ जागा मिळाल्या तर अपक्ष आणि इतरांना ३७ जागा मिळाल्या आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नवनिर्वाचित सर्व नगराध्यक्षांचं अभिनंदन केलं आहे. या निकालाने सर्वांची जबाबदारी वाढल्याचं पवार यांनी नमूद केलं. ते म्हणाले –

**बाईट – उपमुख्यमंत्री अजित पवार**

****

देशभरातल्या आयआयटी आणि त्यांच्या विद्यार्थ्यांचं देशाच्या विकासात आणि प्रगतीत मोठं योगदान असून भारताला जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था करण्यासाठी ज्ञान हे शक्तिशाली माध्यम असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. ते आज मुंबईत आयआयटी पवई इथे एका कार्यक्रमात गडकरी बोलत होते. कोणत्याही देशाचं भविष्य त्याच्याकडे असलेल्या तंत्रज्ञानावर अवलंबून असल्याचं गडकरी यांनी नमूद केलं. ते म्हणाले –

**बाईट – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी**

****

सदनिका घोटाळा प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती दिली आहे. त्यामुळे कोकाटे यांची आमदारकी तुर्तास कायम राहणार आहे. सुनावणी पूर्ण होईपर्यंत कोकाटे यांना आमदार म्हणून अपात्र ठरवलं जाणार नाही, असं सांगत, सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला नोटीस जारी केली आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिका मिळवल्याप्रकरणी दोषी ठरलेले कोकाटे यांना जिल्हा न्यायालयाने दिलेली शिक्षा कायम ठेवत, मुंबई उच्च न्यायालयाने त्यांच्या अटकेला स्थगिती दिली होती. कोकाटे यांनी या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

****

पुण्याजवळच्या लवासा प्रकल्पाला कथित बेकायदेशीर परवानग्या दिल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार, सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्या सीबीआय चौकशीची मागणी करणारी २०२३ सालची जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळली आहे. न्यायालयाने पोलिसांना प्राथमिक माहिती अहवाल-एफआयआर दाखल करण्याचा आदेश देण्याबाबत कायद्यात तरतूद नसल्यामुळे ही याचिका फेटाळत असल्याचं उच्च न्यायालयानं म्हटलं आहे.

****

राजस्थानातल्या अरावली पर्वत रांगेत सुमारे ९० टक्के क्षेत्रात उत्खनन शक्य नसल्याचं, केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव यांनी म्हटलं आहे. आज एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत यादव यांनी, अजमेर आणि उदयपूर सारखी अनेक शहरं या पर्वतरांगेत वसलेली असून, गेल्या कित्येक शतकांपासून इथे नागरी वसाहती असल्याकडे लक्ष वेधलं. तरीही अरावली परिसरात शहरीकरणाचा कोणताही विचार नसल्याचं यादव यांनी स्पष्ट केलं आहे.

****

दिल्लीहून मुंबईकडे येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे ते माघारी वळवून दिल्ली विमानतळावर उतरवण्यात आलं. विमानातले प्रवासी आणि कर्मचारी सुखरूप असल्याची माहिती एअर इंडियाच्या प्रवक्त्यानं दिली आहे. आज पहाटे दिल्ली विमानतळावरुन उड्डाण केल्यानंतर थोड्याच वेळात इंजिनात बिघाड आढळल्यामुळे, विमान परत दिल्लीला वळवण्यात आलं. नागरी वाहतुक मंत्रालयाने या प्रकरणी सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.

****

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील बिबट्यांचा वाढता वावर आणि मानवी वस्त्यांवरील हल्ल्यांच्या घटना रोखण्यासाठी वन विभागाने 'हायटेक' यंत्रणेचा वापर करण्याची सूचना जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या आहेत. संगमनेर तालुक्यातील जवळे कडलग इथं बिबट्याच्या हल्ल्यात दगावलेल्या सिद्धेश सुरेश कडलग याच्या कुटुंबीयांची आज सांत्वनपर भेट घेतल्यानंतर विखे पाटील बोलत होते. बिबट्यांची घनता जास्त असलेल्या भागात 'थर्मल ड्रोन', 'नाईट व्हिजन कॅमेरे' आणि ५०० हून अधिक 'ट्रॅप कॅमेरे' बसवण्यात आल्याची माहिती विखे पाटील यांनी सांगितलं.

****

बीड जिल्ह्याच्या विकासासाठी अधिकाऱ्यांनी स्वयंप्रेरणेने काम करण्याचं आवाहन अपारंपारिक ऊर्जा संचालक सुमन चंद्रा यांनी केलं आहे. त्या आज बीड इथं आकांक्षित वडवणी तालुक्याच्या आढावा बैठकीत बोलत होत्या. वडवणी तालुक्याची प्रगती चांगली असून, आगामी काळात यापेक्षा अधिक गतीनं काम करून महिलांचं जीवनमान उंचवावं, जेणेकरून इथल्या बालविवाहाचं प्रमाण कमी होऊ शकेल असं चंद्रा यांनी म्हटलं आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह प्रशासनातील अधिकारी यावेळी उपस्थित होते.

****

देशाच्या जडणघडणीत डॉक्टर पंजाबराव देशमुख यांचं योगदान अमूल्य असल्याचं, प्रसिद्ध व्याख्याते अक्षय राऊत यांनी म्हटलं आहे. हिंगोली जिल्ह्यातल्या आखाडा बाळापूर इथल्या नारायणराव वाघमारे महाविद्यालयात, डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंती वर्षानिमित्त विशेष व्याख्यान घेण्यात आलं, त्यावेळी राऊत बोलत होते. राऊत यांनी यावेळी देशमुख यांच्या कार्याचा आढावा घेत, त्यांचा जीवनपट उभा केला.

****

धाराशिव इथल्या लोकसेवा समितीचे विविध पुरस्कार परवा प्रदान केले जाणार आहेत. भारतरत्न माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मदिनानिमित्त हे पुरस्कार प्रदान केले जातात. या पुरस्कारच्या यंदाच्या मान्यवरांमध्ये अंबाजोगाईच्या ज्ञानप्रबोधिनीचे प्रसाद चिक्षे, धाराशिव जिल्ह्यात पालावरची शाळा चालवणारे चंद्रशेखर पाटील, तसंच लातूरच्या मातोश्री वृद्धाश्रमाचा समावेश आहे. बुधवारी सायंकाळी चार वाजता प्रमोद महाजन बहुउद्देशीय सभागृहात हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. हे या पुरस्काराचं १६ वं वर्ष आहे.

****

छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी उद्यापासून नामनिर्देशन पत्र भरण्यास सुरुवात होणार आहे. महापालिकेचे निवडणूक निर्णय अधिकारी एकनाथ बंगाळे यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नवनाथ वगवाड यांची नियुक्ती करण्यात आल्याचंही बंगाळे यांनी सांगितलं.

****

राज्यात आज मालेगाव इथं आठ पूर्णांक चार दशांश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. पुणे आठ पूर्णांक सहा, नाशिक आठ पूर्णांक आठ, तर जळगाव इथं साडे नऊ अंश तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर तसंच परभणी इथं साडे १० अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं.

****